**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका पुरस्कार घोषित**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो कार्यक्रम अधिकारी महिला व पुरुष, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका पुरस्काराकरीता पुरस्कारकर्त्यांची निवड करण्यात आली आहे.

शैक्षणिक सत्र २०१९-२० मध्ये विद्यापीठस्तरीय पुरस्कारासाठी महाविद्यालय एकक म्हणून श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला, महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या डॉ. रश्मी जोशी (सावलकर), पुरुष कार्यक्रम अधिकारी म्हणून जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूरचे डॉ. नरेंद्र माने, महिला रासेयो स्वयंसेविका म्हणून श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोलाची कु. सपना बाबर व पुरुष रासेयो स्वयंसेवक म्हणून श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे प्रसाद गुल्हाने यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठस्तरीय रासेयो कार्यक्रम अधिकारी महिला जिल्हा पुरस्कारासाठी अमरावती जिल्ह्याकरीता मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावतीच्या डॉ. मंदा नांदुरकर यांची, अकोला जिल्ह्याकरीता श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोलाच्या डॉ. रश्मी जोशी (सावलकर), बुलढाणा जिल्ह्याकरीता भगवान बाबा कला व वाणिज्य महाविद्यालय, लोणारच्या डॉ. संगिता धंदर, यवतमाळ जिल्ह्याकरीता श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसदच्या डॉ. वैशाली पांडे (गोडबोले) व वाशिम जिल्ह्याकरीता स्व. पुंडलिकराव गवळी कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिमच्या डॉ. स्मिता लांडे यांची तर, पुरुष कार्यक्रम अधिकारी पुरस्कारासाठी अमरावती जिल्ह्याकरीता जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूरचे डॉ. नरेंद्र माने यांची, अकोला जिल्ह्याकरीता श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोलाचे डॉ. रतनलाल येऊल, बुलढाणा जिल्ह्याकरीता श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजि., शेगांवचे प्रा. नितीन ठाकरे, यवतमाळ जिल्ह्याकरीता कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबचे डॉ. दिपक कुटे व वाशिम जिल्ह्याकरीता एस.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय, कारंजाचे डॉ. राजेश माथुरकर यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यापीठस्तरीय रासेयो महिला स्वयंसेविका जिल्हा पुरस्कारासाठी अमरावती जिल्ह्याकरीता श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. मृणाल भोयर हिची, अकोला जिल्ह्याकरीता श्रीमती एल.आर.टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोलाची कु. सपना बाबर, बुलढाणा जिल्ह्याकरीता नारायणराव नागरे महाविद्यालय, दुसरबीडची कु. धनश्री शेवाळे, यवतमाळ जिल्ह्याकरीता शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूरची कु. दामिनी महाजन व वाशिम जिल्ह्याकरीता एस.के.एन.जी. महाविद्यालय, वाशिमची कु. पुजा खडसे हिची तर, पुरुष स्वयंसेवक जिल्हा पुरस्कारासाठी अमरावती जिल्ह्याकरीता ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा ऋषिकेश होनवलकर याची, अकोला जिल्ह्याकरीता श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा प्रसाद गुल्हाने, बुलढाणा जिल्ह्याकरीता जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा विवेक अंभोरे, यवतमाळ जिल्ह्याकरीता श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळचा मयुर अकाले व वाशिम जिल्ह्याकरीता श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाडचा करण वंजारे याची निवड करण्यात आली आहे.

पुरस्कार वितरण समारंभ लवकरच होणार असून पुरस्कारासाठी निवड झालेल्या सर्व रासेयो कार्यक्रम अधिकारी, रासेयो स्वयंसेवक व स्वयंसेविका यांचे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व रासेयो संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २५/११/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

C:\Users\PRO\Desktop\UNIVERSITY NEWS 2020 145